राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय
महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग
ऊरो रुग्णालय, तिसरा मजला, औंध, पुणे – ४११०२७

सत्यमेव जयते

सार्वजनिक आरोग्य विभाग

उपसंचालक आरोग्य सेवा (आ मा जी आ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे

संकेतस्थळ : arogya.maharashtra.gov.in
कार्यालय : ०२० – २६०५८७४७
नानोप विभाग : ०२० – २६०५८२९२
ई -मेल: crs_d81@yahoo.com


| | |
|---|---|
| **आरोग्य सेवा** | जा /८१कक्ष /आमाजीआ.क्र.ना/प.नो.CRS Portal/Registrar Profile Update / /२६ |
| **ना.नों.प.** | दिनांक २६ / ०५ २०२६/. 5996–6036 |

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक, जन्म मृत्यू
जिल्हा परिषद...सर्व

२) कार्यकारी आरोग्य अधिकारी
मुंबई महानगरपालिका

**विषय: CRS Portal मधील निबंधक / उपनिबंधक, जिल्हा निबंधक यांची माहिती अद्ययावत करून अधिक सक्षम करण्याबाबत...**

**संदर्भ : १) RGI पत्र क्र 1/12/2024-VS-(CRS)/2689 दिनांक २२-५-२०२६**
**२) मा. संचालक तथा मुख्य निबंधक यांचे पत्र दिनांक ३०/१२/२०२५**
**३) या कार्यालयाचे पत्र दिनांक २०/०४/२०२६**
**४) सांख्यिकी अधिकारी यांची १६/०१/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त**
**५) जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा शल्य चिकित्सक,आरोग्य अधिकारी (मनपा) यांच्या २३/०१/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार सूचित करण्यात येते की, केंद्र शासनाने विकसित केलेले CRS Portal अधिक बळकटिकरण करण्यासाठी केंद्रशासन सातत्याने विविध उपाययोजना करीत आहेत. विशेषतः CRS पोर्टलद्वारे करण्यात येणाऱ्या "नोंदणी प्रक्रियेतील विश्वासार्हता, जबाबदारीची जाणीव, पारदर्शक कार्यपद्धती आणि माहितीची सुरक्षितता कायम राखण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे." असे संदर्भ पत्र १ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे त्यानुसार निबंधक / उपनिबंधक, जिल्हा निबंधक यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

2. मा. महानिबंधक भारत सरकार व या कार्यालयामार्फत वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत की, नोंदणी निबंधक/ उपनिबंधक व जिल्हा निबंधक यांनी आपले User ID व Password तसेच OTP इतर कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर करू नयेत अशा सूचना दिल्या आहेत. तथापि, काही ठिकाणी निबंधकांच्या User ID व Password चा अनधिकृत रित्या गैरवापर करून आवश्यक पडताळणी न करता, अयोग्य पद्धतीने, जन्म मृत्यू घटनांची नोंदणी करून प्रमाणपत्र तयार केलेले निदर्शनास आले आहे अशा प्रकारच्या कृत्यांमुळे नागरी नोंदणी व्यवस्थेची विश्वासाहर्ता व अखंडता बाधित होत असून बनावट अथवा अनधिकृत जन्म मृत्यू प्रमाणपत्रे निर्गमित होण्याची शक्यता निर्माण होते असे मा. सहायक महानिबंधक, भारत सरकार यांच्या संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये नमूद केले आहे.
3. नागरी नोंदणी प्रणाली CRS पोर्टल अधिक बळकट करण्यासाठी व नोंदणी करणारे निबंधकांचे उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी निबंधक, उपनिबंधक व जिल्हा निबंधक यांची माहिती update करून Authentication करण्यासाठी नवीन features असलेली कार्यपद्धती CRS Portal मध्ये तयार केलेली आहे.
4. केंद्रशासनाच्या CRS पोर्टलमध्ये नवीन सुविधेअंतर्गत खालीलबाबी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत
   i. राज्यातील सर्व निबंधक/ उपनिबंधक व जिल्हा निबंधक यांचे कार्यालयीन नाव अधिकृत अभिलेखाप्रमाणे **अचूकपणे व अनिवार्यपणे नोंदविणे अत्यंत आवश्यक राहील**.
   ii. निबंधक/ उपनिबंधक व जिल्हा निबंधक यांचे पादनाम (Designation) संबंधित अधिकारी यांनी धारण केलेल्या अधिकृत पदानुसार नोंदविणे अनिवार्य आहे (उदा. ग्रामपंचायत अधिकारी, मुख्याधिकारी नगर परिषद/ पंचायत, इ.)
   iii. यापुढे नागरी नोंदणी प्रणालीद्वारे तयार होणाऱ्या जन्म मृत्यू प्रमाणपत्रांवर संबंधित निबंधकाचे नाव व पदनाम प्रर्दशित करण्यात येईल.
   iv. निबंधक, उपनिबंधक व जिल्हा निबंधक यांचा **आधार क्रमांक नागरी नोंदणी प्रणालीतील प्रोफाइल मध्ये अधिकृतरित्या नोंदविणे अनिवार्य आहे.** आधार आधारित नाव व लिग पडताळणीद्वारे प्रमाणीकरण करण्यात येईल. आधार प्रमाणीकरण व सीडिग संबंधित अधिकारी यांनी स्वतः पूर्ण करणे आवश्यक आहे.
5. वरील उपाययोजनांचा उद्देश नोंदणी प्राधिकरणांची जबाबदारी स्पष्ट करणे, अनधिकृत व्यक्तींमार्फत User ID व Password चा गैरवापर रोखणे व नागरी नोंदणी प्रणालीची एकूण विश्वासाहेता व अखंडता अधिक बळकट करणे हा आहे.
6. आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्यासाठी व वापरकर्त्यांचे प्रोफाइल अधिक सक्षम करण्यासाठी मा. महानिबंधक भारत सरकार यांच्यामार्फत प्राप्त आवश्यक मार्गदर्शक सूचनांचे वापरकर्ता माहिती पुस्तिका (User Manual) सोबत जोडण्यात आले आहे.
7. वरील बाबींच्या अनुषंगाने, सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म मृत्यू यांना सूचित करण्यात येते की, आपल्या जिल्हयातील सर्व संबंधित निबंधक, उपनिबंधक जन्म मृत्यू यांना

12/5/2026

सदर सुविधेची तात्काळ माहिती देण्यात यावी तसेच केंद्रशासनाच्या CRS पोर्टलमध्ये आवश्यक प्रोफाइल अद्ययावत व प्रमाणीकरण प्रक्रिया दिनांक ३१.०५.२०२६ पर्यंत पूर्ण करावी.

8. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म मृत्यू यांनी त्वरित त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व निबंधक व उपनिबंधक तसेच ग्रामपंचायत अधिकारी यांना सूचना देतांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांचे उपस्थितीत VC द्वारे बैठक आयोजित करून त्यांना सूचना द्याव्यात तसेच सर्व निबंधक, उपनिबंधक यांना लेखी कळविण्यात यावे.

9. सदर बाब **<u>अत्यंत तातडीची समजून सर्वोच्च प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी</u>** तसेच अनुपालन अहवाल तसेच सोबत जोडलेल्या प्रपत्र १ मधील माहिती या कार्यालयास सादर करण्यात यावी.

डॉ. बी.एस.कमलापूरकर
उपसंचालक, आरोग्य सेवा आ.मा.जी.आ.)
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत कार्यवाहीस्तव:-

उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)

२/ वरीलप्रमाणे सूचना परिमंडळातील सर्व जिल्हयांना निर्गमित कराव्यात व प्रपत्र १ प्रमाणे माहिती देण्यात यावी.

प्रत माहितीस्तव सविनय सादरः-

१. मा. महानिबंधक, भारत सरकार, 2A मान सिंग रोड, नवी दिल्ली.
२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग ,मंत्रालय मुंबई.
३. मा. सहसचिव, भारत सरकार तथा संचालक, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. मा.आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक रा.आ.अ, मुंबई.
५. मा. संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६. मा. संचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म मृत्यू, पुणे.

प्रपत्र १

जिल्ह्यातील निबंधक, उपनिबंधक व जिल्हा निबंधक यांचे आधार प्रमाणीकरण बाबत माहिती ३१/०५/२०२६ पर्यंत सादर करावी

| अनू क्र | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | जिल्हा निबंधक यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात आले आहे किंवा नाही (Yes/No) | एकूण निबंधक | एकूण उपनिबंधक | CRS Portal मध्ये आधार प्रमाणीकरण केलेले एकूण निबंधक | CRS Portal मध्ये आधार प्रमाणीकरण केलेले एकूण उपनिबंधक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | |
| १० | | | | | | | | |